N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर  **P.S.(ठाणे):** ठाणे नगर  **Year (वर्ष):** 2019
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0353  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/12/2019 04:10 बजे
2. 

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** सोमवार  **Date From (दिनांक पासून):** 16/12/2019
   **Time Period (कालावधी):** पहर 6  **Date To ( दिनांक पर्यंत):** 16/12/2019
   **Time From (वेळेपासून):** 17:50 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 17:50 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 17/12/2019  **Time (वेळ):** 03:00 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
   **Entry No. (नोंद क्र.):** 006  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/12/2019 04:10 बजे
4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 0.1 किमी
   **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** प्रकाश रसवंतीगह, जिल्हा परिषद,ठाणे कार्यालयाच्या समोर,स्टेशन रोड ठाणे प

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**
6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
   (a) **Name (नाव):** दिग्विजय कष्णा गावकर
   (b) **Father's Name (वडील चे नाव) :** कष्णा गावकर
   (c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984  (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
   (e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
   (f) **Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (दिल्याची तारीख):**
   **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
   (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
   ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |



Scanned by CamScanner

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 2/4,जॉन मरियान,डिमोलो चाळ,शास्त्रीनगर, कांजुरमार्ग पुर्व,कांजुर मार्ग ,बृहनमुंबई शहर, महाराष्ट्र,400042,भारत |
| 2 | स्थायी पता | 2/4,जॉन मरियान,डिमोलो चाळ,शास्त्रीनगर, कांजुरमार्ग पुर्व,कांजुर मार्ग ,बृहनमुंबई शहर, महाराष्ट्र,400042,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8291786769

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रविंद्र लक्ष्मण पवार | | वडील का नाम : लक्ष्मण पवार | 1. एस- 4,दुसरा माळा, यमुना नगर,, साईदर्शन सोसायटी, बी विंग,चेरपोली रोड ता शहापुर, ठाणे,शहापूर ,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

श्री. दिग्विजय कृष्णा गावकर वय - 35 वर्षे धंदा- लिपीक, राहणार- 2/4 जॉन मरियान, डिमोलो चाळ, शास्त्रीनगर, कांजुरमार्ग पुर्व, मुंबई-400042 मोबाईल नंबर 8291786769मी, वरील प्रमाणे असून वरील नमुद पत्यावर जन्मापासुन कुटूंबासह वास्तव्यास आहे. मी सन 2015 साली ज्ञानगंगा महाविदयालय, कासारवडवली, ठाणे मध्ये कनिष्ठ लिपीक म्हणुन रूजु झालो असुन सन 2015 पासुन नमुद शाळेमध्ये कार्यरत आहे. मी कनिष्ठ लिपीक म्हणुन सरकारी कार्यालये जसे जिल्हा परिषद ठाणे, महानगरपालिका, पीडब्लुडी कार्यालय, पोलीस खाते अशा इतर ठिकाणी शासकीय मान्यता घेण्याचे कामकाज व इतर शालेय कामकाज पाहतो.आमचे शाळेसंदर्भात जास्तीत जास्त परवानगी जिल्हा परिषद कार्यालय, ठाणे येथील शिक्षण विभागाकडुन घेतल्या जातात. नमुद कामामध्ये कायमस्वरूपी मान्यता, नैसर्गिक तुकडी वाढ, तुकडया मान्यता इतर शाळा व कॉलेज मान्यता देणे इ. प्रकारच्या परवानगी घेण्याचे काम मी आमच्या शाळेमार्फत करतो.आमची शाळेची व कॉलेजची अंतीम शासकीय मान्यता ही जिल्हा परिषद कार्यालय, ठाणे येथील शिक्षण विभागाकडुन घ्यावयाची असुन परवानगी मिळणेकरिता सर्व कागदपत्रांची फाईल मी जिल्हा परिषद कार्यालय, ठाणे येथील शिक्षण विभागातील माध्यमिक विभागामध्ये दि. 27/09/2019 रोजी सादर केली होती.सदर मान्यतेच्या संदर्भातील फाईल ही जिल्हा परिषद कार्यालय, ठाणे येथील शिक्षण विभाग श्री. रविंद्र पवार, कनिष्ठ लिपीक त्यांचे नंतर शिक्षण उप निरीक्षक व शिक्षणाधिकारी यांचेकडे मान्यतेकरिता दिली जाते.मी ज्ञानगंगा हायस्कुलच्या मान्यतेबाबत श्री. रविंद्र पवार, कनिष्ठ लिपीक यांचेकडे विचारणा केली असता, त्यांनी मला तुमची मान्यता अशीच मिळणार नाही. तुम्हाला मला व माझे कनिष्ठांना मिळुन संदर मान्यतेकरिता 40,000 /- दयावे लागतील असे सांगितले. सदर वेळी मी त्यांना सदर रकमेची शासकीय पावती मिळेल काय? याबाबत विचारणा केली असता, त्यांनी पावती मिळणार नाही असे सांगितले.त्यानंतर मी शाळेच्या मान्यतेबाबत श्री. रविंद्र पवार कनिश्ठ लिपीक यांचेकडे विचारणा केली असता, त्यांनी मला सांगितले की, पैसे दिले तरच मान्यता मिळेल नाहीतर मान्यता मिळणार नाही.श्री. रविंद्र पवार हे आमचे ज्ञानगंगा हायस्कुल व कॉलेजचे अंतिम परवानगी मान्यता देण्याकरिता माझेकडे 40,000/- रू लाचेची मागणी करीत आहे. परंतु मला श्री पवार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी त्यांचे विरूध्द कारवाई होणेसाठी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे माझे हस्ताक्षरात दि. 16/12/2019 लेखी तक्रार दिली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने पो.नि. योगेश देशमुख यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध करुन त्यांना माझ्या तक्रारीची थोडक्यात हकीगत सांगून लेखी तक्रारीवरून पोनि/देशमुख यांनी पडताळणी कारवाई करण्याचा निर्णय घेतला. तक्रारीच्या अनुषंगाने व पडताळणी कारवाई अनुषंगाने दि. 16/12/2019 रोजी आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन जिल्हा परिषद कार्यालयातील श्री. रवींद्र पवार हे लाचेची मागणी करतात किंवा कसे? याबाबत पडताळणी करण्यासाठी मला डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर लावून शासकिय पंचांसमक्ष जिल्हा परीषद ठाणे कार्यालयात श्री रविंद्र पवार बसत



Scanned by CamScanner

असलेल्या ऑफिसमध्ये पाठविण्यात आले. त्यानंतर मी व पंच श्री. जगताप असे श्री रविंद्र पवार यांचे जिल्हा परिषद कार्यालयात भाडोत्री रिक्षाने गेलो व पोनि. देशमुख इतर पडताळणी पथक हे अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात थांबुन राहिले. मी व पंच जगताप श्री. रविंद्र पवार यांचे जिल्हा परिषद, ठाणे येथील दुसऱ्या माळ्यावरील कार्यालयात गेलो असता त्या ठिकाणी मला लोकसेवक रविंद्र पवार हे मिळुन आले त्यावेळी मी त्यांना विचारले की, माझे ज्ञानगंगा हायस्कुलच्या मान्यतेबाबत काय झाले? त्यावेळी श्री. रविंद्र पवार हे त्यांच्या कामासाठी बंकेत जात असल्याने ते माझे कामासंदर्भात काही बोलले नाहीत. म्हणुन मी व पंच जगताप अँन्टी करप्शन, ठाणे कार्यालयात पडताळणी पथक ज्या ठिकाणी थांबलो होते त्या ठिकाणी आलो. त्यानंतर पोनि.देषमुख यांनी मला लावण्यात आलेले डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढले व त्यामध्ये ध्वनिमुद्रीत झालेले श्री रविंद्र पवार व माझ्या मधील संभाषण ऐकले. आमच्यामध्ये झालेल्या संभाषणामध्ये श्री. रविंद्र पवार यांनी केलेली लाचेची मागणी स्पष्ट केली नसल्याने पोनि.देशमुख यांनी पुन्हा पडताळणी करण्याचा निर्णय घेतला व पुन्हा आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पुन्हा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री. जगताप यांचे सह श्री. रविंद्र पवार यांचे कार्यालयात जाण्यास सांगितले त्याप्रमाणे मी व पंच जगताप असे दोघे भाडोत्री रिक्षाने त्यांचे जिल्हा परिषद येथील दुसऱ्या माळ्यावरील कार्यालयात गेलो. त्यानंतर मी श्री. रविंद्र पवार यांचेशी माझे ज्ञानगंगा हायस्कुलच्या कायस्वरूपी अंतिम मान्यतेबाबत बोलणी करण्यास सुरूवात केली. त्यावेळी श्री. रविंद्र पवार यांना सप्टेंबर महिन्यामध्ये दिलेल्या अंतिम मान्यतेबाबत विचारले असता श्री. रविंद्र पवार म्हणाले की, तुमची फाईल मी बघणार, मडम करणार, साहेबांकडे जाणार असे सांगुन त्यावेळी मी श्री पवार यांना काय ते सांगा ना असे सांगितले. त्यावेळी श्री पवार यांनी इतर फाईलचे पंचवीस असतील बरोबर माझे पाच असतील असे सांगुन त्यांनी कागदावर आकडा लिहुन दिला त्यावेळी मी त्यांना पस्तीस हजार का? असे विचारले असता श्री रविंद्र पवार यांनी तीस हजार दे असे सांगितले. त्यावर मी पवार यांना थोडया वेळात आणुन देतो असे सांगुन पंच श्री. जगताप यांचेसोबत श्री पवार यांचे कार्यालयातुन निघुन पडताळणी पथक ज्या ठिकाणी थांबुन राहिले होते त्या ठिकाणी परत आलो. अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात आल्यानंतर मला लावण्यात आलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढुन पोनि देशमुख यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्ड मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले श्री रविंद्र पवार व माझ्यामधील झालेले संभाषण ऐकले व त्यावरून त्यांनी मला व पडताळणी पथकास सांगितले की श्री. रविंद्र पवार यांनी 30,000/- रू. लाचेची मागणी केलेली असुन लागलीच जिल्हा परिषद, ठाणे कार्यालयात बोलावले आहे व जिल्हा परिषद कार्यालयातच्या खाली आल्यानंतर फोन करण्यास सांगितले आहे.त्यानंतर आमच्यामध्ये झालेल्या संभाषणावरून पोनि/देशमुख यांनी सापळा कारवाई करण्याचा निर्णय घेतला. पोनि/देशमुख यांनी सापळा कारवाई घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यांनी मला, पंचाना व पडताळणी पथकास कारवाई दरम्यान घ्यावयाच्या काळजीबाबत सुचना दिल्या व मला श्री. रविंद्र पवार यांना लाचेची रक्कम उजव्या हाताने देउन श्री. रविंद्र पवार यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर डाव्या हाताने केसावर हात फिरवून नियोजित इशारा करणेबाबत सुचना दिल्या.त्याप्रमाणे पोनि देशमुख यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे मला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावला. त्यानंतर मी व पंच जगताप असे श्री. रविंद्र पवार यांचे जिल्हा परिषद, ठाणे कार्यालयाचे खाली आलो. कार्यालयाचे खाली आल्यानंतर पोनि. देशमुख यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी श्री रविंद्र पवार यांना त्यांचे मोबाईलवर फोन केला असता त्यांनी मला सांगितले की, दहा मिनिटे थांबा मी खाली येतो असे सांगितले. त्यानंतर काही वेळाने श्री. रविंद्र पवार हे खाली आल्यानंतर आम्ही जिल्हा परिषद कार्यालयासमोरील रसवंतीगृहामध्ये गेलो. त्यानंतर मी लोकसेवक रविंद्र पवार, यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम दिली असता, त्यांनी तीस आहे ना. असे म्हणून खाकी लिफाफ्यामध्ये असलेली अँन्थ्रासिन पावडर लावलेली 30000/- रू. लाचेची रक्कम स्विकारून त्यांचे पन्टच्या उजव्या खिशात ठेवली. त्यावेळी मी सापळा पथकास पुर्वनियोजित इशारा केला असता, श्री. रविंद्र पवार यांना सापळा पथकाने 17.50 वा. रंगेहात पकडुन ताब्यात घेतले. सापळा कारवाई दरम्यान केलेल्या तपासणीत श्री. रविंद्र पवार यांचेकडुन लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली असुन त्यावर अँन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म आढळुन आले. हस्तगत नोटांचे नंबर पडताळले असता ते सापळापुर्व कारवाई दरम्यान नोंद केलेल्या नंबर्सप्रमाणे जुळुन आले. वरील कारवाईबाबत दि. 16/12/2019 रोजीचा पडताळणी सापळापुर्व-सापळा पंचनामा करण्यात आला आहे.एकंदरीत दिनांक 16/12/2019 रोजी केलेल्या पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक श्री. रविंद्र लक्ष्मण पवार वय - 45 वर्षे, कनिष्ठ सहायक, शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद ठाणे राहणार - साईदर्शन सोसायटी, बी विंग, दुसरा माळा, एस- 4, यमुना नगर, चेरपोली रोड ता. शहापुर, ठाणे यांनी आमचे ज्ञानगंगा महाविद्यालयाचे कायमस्वरूपी अंतिम मान्यता मिळवुन देण्याकरिता त्यांचे स्वतःकरिता व कनिष्ठां करितस माझेकडे 30,000/- रू. लाचेच्या रक्कमेची मागणी करून प्रकाश रसवंतीगृह, जिल्हा परिषद, ठाणे कार्यालयाच्या समोर, स्टेशन रोड येथे स्विकारताना सापळा पथकाने त्यांना दि. 16/12/2019 रोजी 17.50 वा रंगेहात पकडले आहे. म्हणुन माझी त्यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 (सुधारित 2018)चे कलम 7 व कलम 7 अ प्रमाणे कायदेशिर तक्रार आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Ramrao Madhavrao Somvanshi(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned by CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-यांची

**Name** (नाव): Ramrao Madhavrao [illegible]vansl

**Rank**(पद): (Inspector)

**No.**(सं.):

पोलीस ठाणे अंमलदार

[illegible] पोलीस स्टेशन



Scanned by CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned by CamScanner